**उत्कृष्ट मराठी वाङ्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार सन २०११-२०१२ साठी परिक्षण समितीची नियुक्ती.**

# महाराष्ट्र शासन

**शासन निर्णय क्रमांक-रावापु-२०१२/प्र.क्र.१०४/२०१२/भाषा-३,**
मराठी भाषा विभाग
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
**दिनांक : १० सप्टेंबर, २०१२.**

**संदर्भ :१) समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा विभाग, शासन निर्णय क्र.मवापु-१०९४/प्र.क्र.३५०/सां.का.२, दिनांक ०१ जुलै, १९९५,**
**२) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे पत्र क्र.मवापु-२००७/ प्र.क्र.१५३/सां.का-३ दि.१६ जून, २००७,**
**३) विषयांकित योजनेचा शासन निर्णय समक्रमांक दिनांक १० सप्टेंबर, २०१२.**

**प्रस्तावना :-**

राज्य शासनातर्फे देण्यात येणारे विविध पुरस्कार वितरित करण्याची कार्यवाही यापूर्वी सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत करण्यात येत होती. मराठी भाषेच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषेशी संबंधित सर्व कार्यालये, संस्था व मंडळ एकाच विभागाच्या कार्यक्षेत्राखाली आणण्याकरिता सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २९ नोव्हेंबर, २०१० च्या अधिसूचनेन्वये स्वतंत्र मराठी भाषा विभागाची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेले १) श्री.पु.भागवत पुरस्कार २) उत्कृष्ट मराठी वाङ्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार व ३) विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार हे तीनही पुरस्कार सन २०१२-१३ या वित्तीय वर्षापासून मराठी भाषा विभागाकडे हस्तांतरीत करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यापैकी मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार प्रदान करण्यासाठी साहित्याचे परिक्षण करुन पारितोषिकासाठी शिफारशी करण्याकरीता समिती गठीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

वरीलप्रमाणे विचाराधीन असलेल्या प्रस्तावावर विचार करुन मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्.मय निर्मितीस राज्य पुरस्कार प्रदान करण्यासाठी शिफारस करण्याकरीता वर नमूद करण्यात आलेल्या दिनांक १६ जून, २००७ च्या शासन निर्णयाप्रमाणेच सन २०१२-१३ या वर्षाकरीता श्री.मधु मंगेश कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली पुस्तक परिक्षण समिती गठीत करण्यास शासनाची अनुमती देण्यात येत आहे.

२. समितीचे अध्यक्ष, मा.श्री.मधु मंगेश कर्णिक यांच्या सल्ल्यानुसार प्रत्येक वाङ्.मय प्रकारासाठी परिक्षक निश्चित करुन समिती गठीत करण्याची कार्यवाही सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी करुन प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव पाठवावा. सदरहू समितीची मुदत शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत राहील. दिनांक १० सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयात नमूद केलेल्या समयबध्द कार्यक्रमानुसार आकाशवाणी, वृत्तपत्र आणि दूरदर्शनवरुन योजनेची माहिती प्रसारीत करणे, परिक्षकांकडून पुस्तकांचे परिक्षण वेळेवर करुन

घेणे, परिक्षण समितीच्या बैठकांचे आयोजन करणे, स्पर्धेचा निकाल जाहीर करणे आणि २७ फेब्रुवारी, २०१३ मध्ये पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्याची जबाबदारी सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांची राहील.

३. सदर योजनेवरील खर्च मागणी क्र.झेडएफ - ०२, २२०५ - कला व संस्कृती - (०१)(०३) - उत्तम पुस्तकांना उत्तेजन - ५० इतर खर्च (योजनेतर) या लेखाशीर्षाखाली मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(संगणक संकेतांक क्र. २०१२१२१०१६५२०५४०३३)

ललिता शि. देठे

**( ललिता शि. देठे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रती :-**

१. सचिव, मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.
४. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
७. महालेखाकार (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), महाराष्ट्र, मुंबई.
८. वित्त विभाग (व्यय -४ / अर्थसंकल्प -३ / अर्थसंकल्प - १४), मंत्रालय, मुंबई.
९. सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
१०. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई.
११. अवर सचिव (अर्थसंकल्प), मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. भाषा - ३ (संग्रहार्थ).